# साहस डिसएबिलिटी रिसर्च अँड केअर फाऊंडेशन, कोल्हापूर

# SAAHAS DISABILITY RESEARCH AND CARE FOUNDATION, KOLHAPUR

## वार्षिक अहवाल

## FY 2021-22

अपंगांच्या सार्वांगिण पुर्नवसनासाठी कार्य करणारी संस्था

*Believe.......Become*

रामचंद्र बालाजी वाघमाडे साहसच्या वसतीगृहात प्रशिक्षण घेणारा पहिला पॅराप्लेजिक



व्हिलचेअर साहस फाऊंडेशनने दिली.



बेडवर स्वतः उठुन बसायला शिकले.



बेडवरून व्हिलचेअरवर स्वतः उठुन बसायला शिकले.



संस्थेच्या कामात व्यस्त



FIRST BENEFICIARY OF 'SAAHAS' AT 'ANKUR'. HE WAS FULLY REHABILITATED AND WENT HOME



साहस डिसॅबिलिटी रिसर्च अँड केअर फाऊंडेशन, कोल्हापूर आणि शिरोळ तालुका अपंग पुनर्वसन व आर्थिक सहाय्य संस्था, जयसिंगपूर यांच्या संयुक्त विद्यमाने १ फेब्रुवारी २०२२ रोजी "अंकुर" निवासी व्यावसायिक प्रशिक्षण केंद्राचे मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील (माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि प्रदेशाध्यक्ष, भारतीय जनता पक्ष) यांच्या शुभहस्ते उद्‌घाटन करण्यात आले.




"अंकुर" निवासी व्यावसायिक प्रशिक्षण केंद्राचा उद्‌घाटन सोहळा डावीकडून
श्री. बजरंग गंगाधर (विभागीय अधिकारी-आयसीआयसीआय बँक), श्री सचिन झंवर (झंवर उद्योग समूह),
श्री अण्णासाहेब चकोते (अध्यक्ष-चकोते ग्रुप), मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील,
श्री. अभिषेक मोहिते (उपाध्यक्ष-साहस), श्री तेज घाटगे (सचिव-साहस) आणि
श्री आदगोंडा पाटील (अध्यक्ष-शिरोळ तालुका अपंग पुनर्वसन व आर्थिक सहाय्य संस्था, जयसिंगपूर)

# साहस डिसएबिलिटी रिसर्च अँड केअर फाऊंडेशन, कोल्हापूर

रजि. कार्यालय : द्वारा : श्री. अज़ीज़ हुरजुक, 'नशेमन', २३५/११ इ, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
प्रशासकीय कार्यालय : द्वारा : श्री. साताराम पाटील, २६७/७७ बी, सुंदरसिंग हौसिंग सोसायटी, शांती नगर (पूर्व), उंचगाव, तालुका – करवीर, जिल्हा – कोल्हापूर – ४१६ ००५.
मोबा : श्री साताराम पाटील – ९४२३०४४४९८

## वार्षिक अहवाल
## आर्थिक वर्ष २०२१–२२

**नोंदणी तपशील :**

| | |
|---|---|
| सोसायटीज रजि. कायदा १८६० अंतर्गत : | कोल्हापूर / 0000463 / 2020 दिनांक ३ डिसेंबर २०२० |
| IT कायदा १८६१ च्या कलम 12A अंतर्गत अव्दितीय नोंदणी क्रमांक : | ABATS8107RE20206 दिनांक २७ मे २०२१ |
| ८०–जी अंतर्गत प्राप्तिकर सवलतीसाठी अव्दितीय नोंदणी क्रमांक : | ABATS 8107 RF 20215 दिनांक २४–९–२०२१ |
| NITI आयोग NGO दर्पण युनीक आयडी : | MH/2021/0272245 |
| पॅन क्रमांक : | ABATS8107R |
| उदयम आधार क्र. : | UDYAM-MH-15-0021118 |

# विश्वस्त मंडळ



**डॉ. नसीमा मोहमद अमीन हुरजूक** - अध्यक्षा
संस्थापिका - हेल्पर्स ऑफ दि हॅंडिकॅप्ड, कोल्हापूर (१९८४-२०२०)
समाज सेविका, लेखिका, अपंग हक्कासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्या



**श्री. अभिषेक मोहिते** - उपाध्यक्ष
उद्योजक
संचालक मोहिते उद्योग समूह



**श्री. तेज सतीश घाटगे** - सचिव
उद्योजक
व्यवस्थापकीय संचालक-घाटगे उद्योग समूह



**श्री. अज़ीज़ मोहमद अमीन हुरजूक** - खजानिस
समाजसेवक



**श्री. साताराम गावडू पाटील** - विश्वस्त
समाजसेवक



**श्री. जयप्रकाश काबरा** - विश्वस्त
प्रेरक वक्ता



**श्री. आश्कीन गणी आजरेकर** - विश्वस्त
उद्योजक
समाजसेवक



**श्रीमती भारती मुकेश दलाल** - विश्वस्त
समाजसेविका



**ॲड नकुल गनु पार्सेकर** - विश्वस्त
वकील, समाजसेवक
अध्यक्ष-अटल प्रतिष्ठान, सावंतवाडी, सिंधुदुर्ग



**श्री. सुधीर पाटील** - विश्वस्त
उद्योजक
मालक-ॲटलांटास



**श्री. भरतकुमार शाह** - विश्वस्त
सभागीदार-बाबुलाल हर्गोन्दास आणि कंपनी

## सल्लागार समिती

| | |
|---|---|
| **श्री. एतिबर शाह रहीम खान** | शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते |
| **डॉ. मोहन एस. गुणे** | होमिओपॅथ |
| **डॉ. पद्मराज पाटील** | ऑर्थोपिडिक सर्जन |
| **C.A. कृष्णात पाटील** | सनदी लेखापाल |
| **श्री. अनिल पाटील** | अभियंता |
| **श्री. हिंदूराव पाटील** | अभियंता |
| **श्री. मदन कुलकर्णी** | उद्योगपती |
| **C.S. अमर पाटील** | कंपनी सचिव |
| **C.A. अमोल माडीवाल** | सनदी लेखापाल |

## आयोजन समिती

| | |
|---|---|
| **श्री. बाबा वालावलकर, अनाम प्रेम** | **डॉ. योगेश नवांगुळ** |
| **डॉ. गौरी गणपत्ये** | **डॉ. डी. बी. खानोलकर** |
| **श्री. प्रमोद भोगते** | **सौ. कौसर संगरार** |
| **सौ. मधू महादेव पाटील** | **डॉ. मुस्कान नाकाडे** |

## निधी उभारणी समिती

**श्री. अयाज संगरार** **डॉ. ध्रुव मेहता** **सौ. इर्शाद अजीज हुरजुक**

## आमचा वैद्यकीय पाठिंबा

<table>
<tr><td>डॉ. मोहन गुणे, होमिओपॅथ, कोल्हापूर.</td><td>डॉ. पद्मराज पाटील, एमबीबीएस, डीएनबी (ऑर्थो)</td></tr>
<tr><td>डॉ. नुमान तुंगेकर BUMS, DHA मुंबई</td><td>डॉ. पी. जी. कुलकर्णी, एमएस (ऑर्थो)</td></tr>
<tr><td>डॉ. अनिकेत आठले, रेडिओलॉजिस्ट</td><td>डॉ. संतोष कुलकर्णी, ईएनटी, सोहम हॉस्पिटल</td></tr>
<tr><td colspan="2">डॉ. आर. एस. पाटील, एम.डी. (पॅथ), अंबिका पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरी, कोल्हापूर.</td></tr>
<tr><td colspan="2">डॉ. मिलिंद वानखेडे, बीडीएस, (बॉम), महालक्ष्मी डेंटल लेसर आणि इम्प्लांट सेंटर</td></tr>
<tr><td colspan="2">डॉ. राहुल गुणे, FCPS,MNAS, DNB (URO), निर्मल नर्सिंग होम, लेझर आणि लिथोट्रिप्सी क्लिनिक</td></tr>
<tr><td colspan="2">डॉ. अनघा कुलकर्णी, स्त्रीरोग आणि प्रसूतीतज्ज्ञ, सोहम हॉस्पिटल</td></tr>
<tr><td>डॉ. शरद शिंदे, उंचगांव.</td><td>डॉ. डी.वाय. पाटील हॉस्पिटल, कोल्हापूर.</td></tr>
<tr><td colspan="2">डॉ. गौरी गुरूनाथ गणपत्ये, एमएस (आयु.), ओबीजीवाय, पीजीडीडी, स्त्रीरोगतज्ज्ञ आणि आहार</td></tr>
</table>

# साहस की बात...



२०२१–२०२२ या आर्थिक वर्षातील आमच्या कार्याचा अहवाल सादर करताना आम्हाला आनंद होत आहे. आम्ही यापूर्वी ३ डिसेंबर २०20 पासून ते ३१ जुलै २०२१ पर्यंत आठ महिन्यांच्या कालावधीतील कार्याचा अहवाल सादर केला होता. मागील अहवालामध्ये शेवटचे चार महिने (एप्रिल–जुलै २०२१) आर्थिक वर्ष २०२१–२२ मध्ये येत असल्याने, अहवालाचे काही मुद्दे पुनः आले असतील. तथापि रेकॉर्डसाठी आणि नवीन देणगीदारांच्या माहितीसाठी ज्यांना पूर्वीच्या आठ महिन्यांचा अहवाल प्राप्त झाला नाही त्या कार्याचा अहवाल देणे गरजेचे आहे.

साहस ३ डिसेंबर २०20 रोजी नोंदणीकृत करण्यात आले आणि १६ जानेवारी २०२१ रोजी अधिकृतपणे सुरू करण्यात आले. साहस चे उद्दिष्ट अपंग व्यक्तींना **(PwD)** सर्वांगीण पुनवर्सन सेवा प्रदान करणे आहे. या सेवांमध्ये समुपदेशन आणि प्रेरणा, त्यांना कृत्रिम पाय, व्हील चेअर, कॅलिपर, क्रॅचेस इत्यादी देऊन त्यांची हालचाल सुधारणे, त्यांच्या वैद्यकीय समस्यांचे निराकरण करणे, मुख्यतः त्यांच्या बेड सोअर्सवर उपचार करणे, फिजिओथेरपी प्रदान करणे, त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे, ओणि रोजगार उपलब्ध करून देणे आहे. कोविड–१९ साथीच्या आजारादरम्यान आम्ही अपंग कुटुंबांना रेशन देखील पुरवले. आमच्या विनंतीवरून आमचे कुटुंब आणि मित्रांनी २७ संकटग्रस्त कुटुंबांना थेट निधी हस्तांतरित केला.

अहवाल कालावधीत आपला देश कोविड–१९ साथीच्या आजाराशी झुंज देत होता. आपल्या कोट्यवधी देशबांधवांप्रमाणे आणि विद्यार्थ्यांप्रमाणेच, आम्हालाही आमच्या प्रशासकीय कार्यालयातून काम करण्याची सक्ती करण्यात आली. तथापि आमच्या कर्मचाऱ्यांनी **Whatsapp** ग्रुप व्दारे अपंगांचे नेटवर्क तयार केले आणि आम्ही संपूर्ण महाराष्ट्रातील दुर्गम गावांमध्ये अपंगांपर्यंत पोहोचू शकलो. यामुळे डिसेंबर २०20 पासून ते ३१ मार्च २०२२ पर्यंत आम्हाला २७७ अपंगांची नोंदणी करता आली.

आम्हाला दि गंगा फौऊंडेशन, चेन्नई कडून कै. श्री. वैद्यनाथन सर यांच्या सौजन्याने ५० चांगल्या दर्जाच्या व्हील चेअर मिळाल्या. आम्ही आणखी व्हील चेअर मिळवल्या आहेत. आणि आत्तापर्यंत आम्ही संपूर्ण महाराष्ट्रात १०५ व्हील चेअर गरजू अपंगांना वितरित केल्या आहेत. आमचे सचिव श्री. तेज घाटगे यांच्या मालकीच्या तेज कुरियरच्या सौजन्याने आम्ही व्हील चेअर अपंगांच्या घरपोच केल्या.

आम्ही एका इतर स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने अपंगांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने अनुकूल पायाभूत सुविधा असलेला निवासी व्यवसायिक पुनर्वसन केंद्र सुरू केले आहे. याबद्दल अधिक माहिती आतील पानात दिली आहे.

आम्ही आमच्या काही लाभार्थ्यांचे अभिप्राय समाविष्ट केले आहेत. साहसच्या मदतीने त्यांचे जीवनमान कसे सुधारले ते त्यांनी व्यक्त केले आहे. साहस करत असलेल्या कामाच्या परिणामकारकता जाणून घेण्यासाठी कृपया हे अभिप्राय नक्की वाचा. अपघातामुळे अपंग झालेले आणि घर आणि अंथरूणावर बंदिस्त झालेले तरूण–तरूणी आता स्वावलंबी बनत आहेत. जगात वावरत आहेत आणि ताजी हवा, सूर्यप्रकाश यांचा आनंद घेत आहेत आणि त्यांच्या अपंगत्वामुळे गमावलेली त्यांची प्रतिष्ठा परत मिळवत आहेत.

पराकोटीच्या अपंग व्यक्तींसाठी निवासी पुनर्वसन केंद्र आवश्यक आहे. जिथे त्यांना योग्य वैद्यकीय सेवा व रोजगारांसाठी उपयुक्त असे व्यावसायिक प्रशिक्षण देता येईल. साधारण पन्नास अपंगांची सोय होऊ शकेल असे निवासी पुनर्वसन केंद्र उभारण्याचा खर्च अंदाजे २.५ कोटी असेल. आमच्या देणगीदारांनी या प्रकल्पासाठी उदारपणे योगदान देण्याची आम्ही अपेक्षा आणि विनंती करतो.

आमचे विश्वस्त, सदस्य, कर्मचारी, डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट आणि मूल्यवान देणगीदार या सर्वांच्या एकत्रीत प्रयत्नांने आम्ही शेकडो अपंग बांधवांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा करू शकलो. हे यशच आम्हाला अधिकाधिक अपंगांपर्यंत आमचे कार्य पोहोचवण्यास प्रवृत्त करत आहे. या सर्वांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

आपल्या प्रोत्साहनाबद्दल आम्ही पुन्हा एकदा मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो आणि भविष्यातही आपल्या सतत पाठिंब्याची अपेक्षा करतो. आपणास आणि आपल्या परिवारास आमच्या हार्दिक शुभेच्छा !

**डॉ. नसीमा हुरजुक**
अध्यक्ष

# प्रार्थना

इतनी शक्ति हमे देना दाता, मन का विश्वास कमजोर हो ना
हम चलें नेक रस्ते पे हम से, भूल कर भी कोई भूल हो ना

दूर अज्ञान के हो अंधेरे, तू हमे ज्ञान की रोशनी दे
हर बुराई से बच के रहे हम, जितनी भी दे भली जिंदगी दे
बैर हो ना किसी का किसी से, भावना मन में बदले की हो ना

हम ना सोचें हमे क्या मिला है, हम ये सोचे किया क्या है, अर्पण
फूल खुशियो के बाटें सभी को, सब का जीवन ही बन जाए मधुबन
अपनी करूणा का जल तू बहा के, कर दे पावन हर एक मन का कोना

# A Prayer........

O Lord, give us enough strength so that we do not lose our self confidence,
Let's walk the straight path and not make any mistakes even by chance

Let the darkness of ignorance be removed,with the Light of Knowledge
We may stay away from all evil, Give us a good life however long You choose
We may not harbour any ill-will towards anyone,
Neither have the intention of taking revenge,

Let's not think what we have received,
But think what we have given,

Let us distribute the fragrance of flowers to everyone,
So that the life of everyone  becomes like a garden

Let your Mercy flow freely to Bless Every corner of our hearts
Let your Mercy flow freely to Bless Every corner of our hearts

**'अंकुर' निवासी पुनर्वसन आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन :**

आम्ही अशा जागेच्या शोधात होतो जिथे आम्ही अपंगांच्या रहाण्याची व त्यांना विविध सेवा पुरवण्याची सोय करू शकू. आम्हाला कळवण्यास आनंद होत आहे की शिरोळ तालुका अपंग सहाय्य व आर्थिक पुनर्वसन संस्था, जयसिंगपूरचे अध्यक्ष श्री. आदगोंडा पाटील आणि त्यांच्या समितीने आम्हाला नांदणी गावात जयसिंगपूर येथील इमारतीचा वापर करण्यास परवानगी दिली आहे. जी अपंगांच्या पुनर्वसन कार्यासाठी अतिशय योग्य आहे. सुविधेचे नूतनीकरण केल्यानंतर आम्ही २२ नोव्हेंबर २०२१ पासून पुनर्वसन सेवा देण्यास सुरुवात केली. या पुनर्वसन केंद्राचे नांव 'अंकुर' पुनर्वसन आणि व्यवसायिक प्रशिक्षण केंद्र आहे.

'अंकुर' पुनर्वसन केंद्राचे अधिकृतपणे उद्घाटन १ फेब्रुवारी २०२२ रोजी मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील, माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष यांचे शुभ हस्ते झाले. कार्यक्रमास चकोते उद्योग समूहाचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब चकोते, झंवर ग्रुपचे श्री. सचिन झंवर व इतर मान्यवर उपस्थित होते. अनेक दिव्यांग व्यक्ती आणि नांदणी आणि जयसिंगपूर येथील लोक, एकूण सुमारे २०० लोक उपस्थित होते. श्री. चंद्रकांतदादा पाटील यांनी डॉ. नसीमा हुरजुक आणि यांच्या गेल्या चार दशकांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. त्याचप्रमाणे श्री. अण्णासाहेब चकोते यांनीही होत असलेल्या कार्याचे कौतुक केले व दिव्यांगांना रोजगारासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. श्री. बजरंग गंगाधर, अधिकारी आय.सी.आय.सी.आय बँक यांनी आपल्या बँकेकडून सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. श्री. अयाज संगरार यांनी प्रास्ताविक केले व सौ. अनुराधा तस्ते यांनी सूत्र संचालन केले.

**दिव्यांग व्यक्तिंचे सर्वेक्षण आणि नोंदणी :**

दि. ९,१०,११,१२ नोव्हेंबर २०२१ रोजी अंकुर येथे नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले होते, एकूण १८ दिव्यांगांनी या शिबीरात भाग घेतला होता.

दि. २७ नोव्हेंबर २०२१ रोजी टाकवडे गावातील दिव्यांगांसाठी अंकुर येथे नोंदणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात एकूण २१ दिव्यांगांनी सहभाग घेतला.

दि. २९ नोव्हेंबर २०२१ रोजी जांभळी गावातील दिव्यांगांसाठी अंकुर येथे नोंदणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात एकूण १२ दिव्यांगांनी सहभाग घेतला.

**सातारा जिल्ह्याचा दौरा :**

दि. ६ ऑक्टोबर २०२१ ते १५ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत सातारा जिल्ह्याचा सविस्तर दौरा करण्यात आला. या दौऱ्यात डॉ. नसीमा हुरजुक, श्री. साताराम पाटील आणि श्रीमती मधुताई पाटील यांनी खालील केंद्रांना भेट दिली.

- चार निवासी पुनर्वसन केंद्रे त्यापैकी दोन मतिमंदांसाठी, एक पॅराप्लेजिया असलेल्या व्यक्तीसाठी आणि एक मानसिकदृष्ट्या अपंग सह-विकृती असलेल्यांसाठी.

- साहस च्या दोन लाभार्थ्यांना गृह भेट.

- साहस लाभार्थ्यांच्या पालकांची मुलाखत. मुलाखतीला आठ पालक उपस्थित होते.

साहसचे अधिकारी पुण्यात अपंग महामेळाव्यात सहभागी झाले होते. २५० हून अधिक दिव्यांग त्यांच्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी एकत्र आले होते. त्यांना डॉ. नसीमा हुरजुक यांनी मार्गदर्शन व प्रेरणा दिली. या दौऱ्यांत डॉ. नसीमा हुरजुक आणि सहकार्यांनी ४५० व्यक्तींची भेट घेतली त्यापैकी ३३६ दिव्यांग व्यक्ती होत्या.

डॉ. नसीमा हुरजुक आणि अधिकाऱ्यांनी मुंबई आणि पुण्यातील २५ देणगीदारांना भेट दिली त्यांना साहस च्या कार्याची माहिती दिली.

**कार्याचा संक्षिप्त अहवाल :**
**(३१ मार्च २०२२ पर्यंतचे आकडे)**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| नोंदणीकृत अपंगांची संख्या | पुरुष | २०२ | स्त्री | ७५ | एकूण | २७७ |
| प्रवेशित लाभार्थ्यांची संख्या | पुरुष | १४ | स्त्री | ९ | एकूण | २३ |
| पुनर्वसन झालेल्या आणि घरी घेलेल्या लोकांची संख्या. | पुरुष | ९ | स्त्री | ४ | एकूण | १३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| कर्मचारी संख्या | पुरुष | ३ | स्त्री | ४ | एकूण | ७ |
| प्रशिक्षणार्थींची संख्या | पुरुष | ११ | स्त्री | ५ | एकूण | १६ |

| | | |
|---|---|---|
| मिळालेल्या देणगीची रक्कम | १८६ देणगीदारांकरून | रू. ४०,५१,७०१ |

**वस्तूरूप देणग्या :**

| देणगीदाराचे नांव | साहित्य दान केले | प्रमाण | रक्कम (रू.) |
|---|---|---|---|
| दि गंगा फौऊंडेशन | व्हील चेअर्स | ५० | ४,२६,४०५ |
| श्री. अभिषेक मोहिते | ऑफिस फाईल्स | २०० | ५,००० |
| श्री. अभिजित होगाडे | डबल बेडशीट | १० | २,००० |
| श्री. भरतकुमार शहा | औषधे | विविध | ५,४१५ |
| मेसर्स टेसितुरा मोंटी प्रा. लि. | कापड | ७५ मीटर | ७,९६९ |
| डॉ. नुमान तुंगेकर | व्हील चेअर | १ | १०,००० |
| सौ. कौसर अयाज संगरार | नवीन कॅनन कलर प्रिंटर | १ | १८,००० |
| डॉ. संजय किनारे | नवीन लहान रेफ्रिजरेटर | १ | ७,००० |
| डॉ. संजय किनारे | नवीन व्हॅक्युम क्लिनर | १ | ५,००० |
| सौ. नेहा वैद्य | वापरलेले रेफ्रिजरेटर | १ | ७,००० |
| डॉ. शोभा नल्लूरवार | छताचे पंखे वापरलेले | ६ | ६,००० |
| श्री. तेज सतीश घाटगे | हॉस्पिटल बेड | १० | ५५,००० |
| श्री. अभिषेक मोहिते | शिलाई मशिन | २ | ३०,००० |
| श्री. वसीम हुरजूक | तांदूळ | २५ कि. | १,२५० |
| श्री. संताराम सतेजा | ब्लँकेटस् | २५ | ३,७५० |
| श्री. अविनाश वाडीकर | कापसाच्या गाद्या | १० | ७,००० |
| श्री. वसीम हुरजूक | चादरी | १७ | ३,४०० |
| श्री. अजीज हुरजूक | एलईडी टेलिव्हिजन वापरलेले | १ | १०,००० |
| श्री. किरण पचारे | किराणा साहित्य | विविध | १,६७० |
| देणग्यांचे एकूण मूल्य | | | रू. ६,११,८५९ |

**अपंगांचे पुनर्वसन :**

| तपशील | लाभार्थ्यांची संख्या | किंमत (रू.) |
|---|---|---|
| अपंगांना भेट दिलेल्या व्हीलचेअर | १०९ | १०,२३,४०१ |
| अपंगांना भेट दिलेली इतर उपकरणे | ८ | १,१७,०५० |
| अपंगांना वैद्यकीय मदत दिली | ९ | १,५९,३९७ |
| एकूण वैद्यकीच मदत व उपकरणे (क) | १२६ | १२,९९,८४८ |
| अपंगांना दिलेली शैक्षणिक मदत | ११ | २२,००० |
| व्यावसायिक प्रशिक्षण खर्च | | २१,१२२ |
| अपंगांच्या पुनर्वसनावर झालेला खर्च | २३ | ६,५२,५६८ |
| शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसनावर झालेला खर्च (ख) | ३४ | ६,९५,६९० |
| एकूण खर्च (क+ख) | १६० | १९,९५,५३८ |

**देणगीदाराने अपंगांना परस्पर केलेली मदत :**

| तपशील | लाभार्थ्यांची संख्या | किंमत (रू.) |
|---|---|---|
| अपंगांसाठी अनुकूल घरे आणि स्वच्छतारगृहांमध्ये बदल | ३ | २,०३,३८५ |
| आमच्या आवाहनाला प्रतिसाद देत कोविड-१९ साथीच्या काळात देणगीदारांची थेट अपंगांना दिलेली मदत | २७ | १,१८,३०० |
| अपंग व्यक्तींच्या पुनर्वसन आणि मदतीसाठी खर्च केलेली एकूण रक्कम | ३० | ३,२१,६८५ |

| | | |
|---|---|---|
| एकूण उत्पन्न | रू. ४१,२२,३६८ | |
| अपंगांच्या पुनर्वसनासाठी खर्च केलेली एकूण रक्कम | | रू. १९,९५,५३८ |
| प्रशासकीय खर्च (पगार, वीज, वाहने इ.) | | रू. ७,०८,३९० |
| एकूण खर्च | | रू. २७,०३,९२८ |

**३१ मार्च २०२२ पर्यंत शिल्लक**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एफडी | रू. १६,००,००० | बँक | रू. १,०५,८३९ | रोख | रू. ६,५१६ | एकूण | रू. १७,१२,३५५ |

### व्यवसायिक प्रशिक्षण :

### मेणबत्ती बनवण्याचा प्रकल्प :

आम्ही दिव्यांग व्यक्तींना साध्या आणि शोभेच्या मेणबत्या बनवण्याचे प्रशिक्षण दिले. मेणबत्त्या बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल (मेण) आणि साचे आम्ही उपलब्ध करून दिले. प्रशिक्षण घेतल्यानंतर दिव्यांग स्वतःच्या घरातून मेणबत्या बनवू शकतात. त्यांनी बनवलेल्या मेणबत्या उजाला ब्रँडच्या नावाने विक्री करण्यास साहस मदत करते.

या प्रकल्पांतर्गत पाच दिव्यांगांना मेणबत्या बनविण्याचे व्यवसायिक प्रशिक्षण देण्यात आले. श्री. सचिन पिंपरे, श्री. सुरेश पाटील, श्री. सागर सुतार, श्री. अजित भास्कर, श्री. अक्षय भास्कर ते आता त्यांच्या घरी मेणबत्या तयार करण्यास सक्षम आहेत.

### शिलाई / टेलरिंग प्रकल्प :

तीन जणांना शॉपिंग बॅग आणि इतर लहान वस्तू शिवण्याचे व्यावसाईक प्रशिक्षण देण्यात आले. श्री. गोविंद वडर, श्री. सूर्यकांत जमादार व सौ. नंदिनी पाटील अशी त्यांची नावे आहेत.

### स्वयंपाक आणि स्यंपाकघर व्यवस्थापन :

कु. मीनाक्षी सुतार यांना स्वयंपाक आणि स्वयंपाकघर व्यवस्थापनाचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले.

### व्हील चेअर वितरण :

आमच्या विनंतीवरून चेन्नईच्या दि. गंगा फौऊंडेशनने आम्हाला पन्नास व्हील चेअर दान केल्या. या ५० व्हील चेअर व्यतिरिक्त, साहस ने. रू. १,७५,५०० किंमतीच्या ५५ व्हील चेअर खरेदी केल्या आणि डॉ. नुमान तुंगेकर यांनी दान केलेल्या एक व्हील चेअरचेही वाटप करण्यात आहे.

कोविड-१९ च्या प्रवासी निर्बंधांमुळे, दूरच्या छोट्या गावात राहणाऱ्या लाभार्थ्यांना व्हील चेअर घेण्यासाठी कोल्हापूरात येणे कठीण आणि महाग झाले असते. आमचे सचिव श्री. तेज घाटगे यांनी त्यांच्या मालकीच्या तेज कुरिअर्स मार्फत साहस कडून कोणतेही शुल्क न घेता लाभार्थ्यांच्या घरी व्हील चेअर पोहोचवल्या.

### व्हील चेअर व्यतिरिक्त इतर साधने आणि उपकरणे :

श्री. साजिद अमीरखान पठाण, पुण्यातील अपंग व्यक्ती, ज्यांना एक कृत्रिम पाय आहे आणि काम करत असताना त्यांचा कृत्रिम पाय मोडला. ओटोबॉक या जर्मन कंपनीने दुरूस्ती आणि भागांसाठी रू. ५०,००० लागतील असे सांगितले. आम्ही आमच्या मित्रांना आवाहन केले आणि बेळगांव येथील डॉ. मोईनुद्दीन मोखाशी यांनी ५०,००० रूपये देणगी देऊन दुरूस्तीसाठी प्रायोजित केले. श्री. पठाण आता राज्य परिवहन मंडळाच्या त्यांच्या ड्युटीवर हजर झाले आहेत.

आम्ही साताऱ्याचे श्री. सूर्यकांत गोविंद खैरमोडे यांना रू. १,८०० किंमतीच्या कुबड्या जोडी दिली आणि श्री. नितीन हणमंत शिंदे यांना रू. ७०० किंमतीचे एक एल्बो क्रच दिले.

### जागतिक अपंग दिन साजरा :

दि. ३ डिसेंबर २०२१ रोजी जागतिक अपंग दिन साजरा करण्यात आला. कोविड-१९ साथीच्या प्रतिबंधामुळे, उचगांव येथील आमच्या प्रशासकीय कार्यालयात एका छोट्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. शरद शिंदे व श्री. राजाभाऊ मुडशिंगीकर यांच्या हस्ते दोन व्हील चेअरचे वाटप करण्यात आले.

दि. ४ डिसेंबर २०२१ रोजी अंकुर येथे जागतिक अपंग दिन साजरा करण्यात आला. डॉ. सुरेश पाटील, डॉ. नीलम पाटील व श्री. श्रीधर पाटील यांच्या हस्ते चार व्हील चेअरचे वाटप करण्यात आले.

**स्नेह भोजन योजना :**

फीड युवर फ्रेंड्स योजने अंतर्गत आम्ही नांदणी, जयसिंगपूर किंवा इतर कोठेही राहणाऱ्या लोकांना अंकुर च्या निवासी लाभार्थ्यांसाठी जेवण प्रायोजित करण्यासाठी प्रोत्साहित करतो. देणगीदार आमच्या स्वयंपाकघरात जेवण तयार करू शकतात किंवा कच्चा माल दान करू शकतात. अन्यथा ते योग्य रक्कम सुध्दा रोख स्वरूपात देऊ शकतात.

दि. १९ मार्च २०२२ रोजी जयसिंगपूर येथील श्री. किरण पचारे यांनी अंकुर निवासी लाभार्थ्यांसाठी दुपारचे जेवण प्रोयोजित केले. त्यांनी आवश्यक साहित्य पुरवले आणि दुपारचे जेवण अंकुर येथे तयार करण्यात आले.

दि. २३ मार्च २०२२ रोजी जयसिंगपूरचे श्री. अशोक गोसावी यांनी अंकुर येथील निवासी लाभार्थ्यांसाठी खास रात्रीचे जेवण आणले.

आम्ही दोन्ही देणगीदारांचे त्यांच्या उदारतेबद्दल आभारी आहोत.

**कोविड-१९ महामारी दरम्यान अपंगांना मदत :**

कोविड-१९ महामारीने जगभरातील लाखो लोकांचे जीवन उध्वस्त केले आहे. आम्ही अधिकृतपणे साहसचे कार्य सुरू केल्यानंतर लगेचच कोविड-१९ ने आपल्या देशात धुमाकूळ घातला इतर सर्वांप्रमाणेच, अपंगांनीही त्यांची अल्प उपजीविका गमावली. साहस ने त्यावेळी साहस कडे नोंदणी केलेल्या अपंगांना पाठिंबा देण्याचे आवाहन कुटुंब आणि मित्रांना केले. आम्हाला कळवण्यास आनंद होत आहे की, एकूण २७ अपंग कुटुंबांना देणगीदारांकडून त्यांच्या बँक खात्यात थेट रू. १,१८,३००/- पाठवण्यात आले.

**माहितीपूर्ण व्हिडिओंची निर्मिती :**

लहान खेड्यांमध्ये राहणाऱ्या बहुतेक अपंग व्यक्तींना अगदी प्राथमिक स्वच्छता पध्दतीबद्दलही माहिती नसते ज्यामुळे त्यांचा त्रास बऱ्याच प्रमाणात कमी होऊ शकते आम्ही आमच्याकडे नोंदणी केलेल्या सर्व २७७ दिव्यांगांचा व्हॉट्सअॅप ग्रुप तयार केला आहे. या ग्रुपवर आमचे स्वतःचे अपंग स्वयंसेवक कॅथेटर वापरणे, व्हील चेअरवरून बेडवर जाणे आणि उलट, ऑटो रिक्षाने प्रवास करणे, जखमांवर मलमपट्टी करणे इत्यादी विषयांवर छोटे व्हिडिओ बनवतात. अपंगांचे जिवन सुसह्य होण्यासाठी उपयोगी सूचना आम्ही या व्हॉट्सअॅप ग्रुपव्दारे त्यांना देतो. शिवाय या ग्रुप अॅक्टिव्हिटीमुळे सदस्यांमध्ये मैत्रीचे नाते निर्माण झाले आहे.

**बेड सोअसवर उपचार :**

अंथरूणाला खिळलेल्या अनेक अपंग व्यक्तींना बेड सोअर्स होतात. हे बेड सोअर्स खूप वेदनादायक आणि भावनिकदृष्या निराशाजनक असतात. खरं तर, यापैकी बहुतेक बेड सोअर्स काही सावधगिरी बाळगून टाळता येतात. विशिष्ट औषधे आणि स्वच्छता पध्दतीव्दारे देखील यावर उपचार केले जाऊ शकतात.

बेड सोअर्सच्या उपचाराबाबत मुंबईचे तज्ज्ञ, डॉक्टर डॉ. नूमान तुंगेकर यांचे सहकार्य लाभले हे आमचे भाग्य आहे. डॉ. तुंगेकर यांनी आम्हाला काही मलम सांगितले आहेत जे घरच्या घरी बेड सोअर्सवर लावता येतात. डॉ. नूमान तुंगेकर यांनी सांगितलेल्या उपचाराने बहुतेक अपंगांच्या जखमा चांगल्या प्रकारे भरून आल्या आहेत.

डॉ. नूमान तुंगेकर यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

**डॉ. नसीमा हुरजूक यांना ममता पुरस्कार प्रदान :**

दि. ८ मार्च २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त डॉ. नसीमा हुरजूक यांना ''मा. साहेब श्रीमती मीनाताई ठाकरे ममता पुरस्कार'' मुंबईच्या जाणीव ट्रस्टतर्फे प्रदान करण्यात आला. मुंबई येथे झालेल्या एका शानदार कार्यक्रमात हा पुरस्कार डॉ. नसीमा दीदींच्या वतीने साहस च्या कर्मचारी सौ. मधुताई पाटील यांनी स्विकारला. खासदार श्री. अरविंद सावंत यांनी नसीमा दीदींनी स्वतः अपंग असतानाही अपंगांच्या पुनर्वसनासाठी केलेल्या कार्याची प्रशंसा केली.

सन्मानपत्र आणि एक लाख, एक हजार रूपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. नसीमा दीदी यांनी पुरस्काराची संपूर्ण रक्कम अपंगांच्या पुनर्वसनासाठी साहस ला दान केली.

**TSF च्या अध्यक्षपदी डॉ. नसीमा हुरजुक :**

नवी दिल्लीच्या दि. स्पाइनल फाऊंडेशन च्या विश्वस्त मंडळाने डॉ. नसीमा हुरजूक यांची तीन वर्षांच्या कालावधीसाठी (फेब्रुवारी २०२२ ते फेब्रुवारी २०२५ पर्यंत) अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. मागील अनेक वर्षापासून दि स्पायनल फाऊंडेशन पाठीच्या कण्याला दुखापत झालेल्या व्यक्तिंच्या कल्याणासाठी आणि सर्वांगीण पुनर्वसनासाठी काम करत आहे. डॉ. नसीमा हुरजूक यांची ही प्रतिष्ठेची नियुक्ती आहे.

**श्री. एस. वैद्यनाथन (वैदीसर) यांना श्रध्दांजली :**

चैन्नईच्या दि गंगा फाऊंडेशनचे सह-संस्थापक श्री. एस. वैद्यनाथन (वैदी) यांच्या निधनाबद्दल आम्ही दुःख व्यक्त करतो. दि गंगा फाऊंडेशनकडून साहसला पन्नास व्हील चेअर मिळवून देण्यात वैदी सरांचा मोलाचा वाटा होता. वैदी हे IIM बंगलोरचे १९९२ चे माजी विद्यार्थी होते. जेव्हा त्यांना पाठीच्या कण्याला दुखापत झाली आणि पॅराप्लेजिक झाले. दि हिंदू ग्रुप आणि सुंदरम फायनान्समध्ये काम केल्यानंतर वैदी सरांनी आपले जीवन अपंगांच्या पुनर्वसनासाठी वाहून घेतले. मे २०२१ मध्ये अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले.

वैदी सर हे एक द्रष्टे, एक असाधारण माणूस होते. ज्यांनी पाठीच्या कण्याला दुखापत असलेल्या हजारो व्यक्तींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणले.

या महान आत्म्याला चिरशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**आमचे मनापासून आभार :**

- श्री. आदगोंडा पाटीलसाहेब, अध्यक्ष, ''शिरोळ तालुका अपंग पुनर्वसन व आर्थिक सहाय्य संस्था, जयसिंगपूर'' आणि त्यांच्या व्यवस्थापकीय समितीने आम्हाला त्यांनी बांधलेल्या इमारतीचा वापर करण्यास परवानगी दिली. आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत. आम्ही या इमारतीतून 'अंकुर' पुनर्वसन केंद्र चालवत आहोत आणि अनेक दिव्यांग व्यक्तींना पुनर्वसन सेवा देत आहोत.

- डॉ. पद्मराज पाटील हे जयसिंगपूरचे ऑर्थोपिडिक सर्जन आहेत. आमच्या विनंतीवरून त्यांनी आमचे लाभार्थी उमेश बोबडे यांची त्यांच्या बेड सोअर्ससाठी शस्त्रक्रिया केली. अशा शस्त्रक्रियेसाठी साधारणपणे रू. ३५,००० ते रू. ४०,००० खर्च येतो. मात्र डॉ. पद्मराज पाटील यांनी ते निशुल्क केले. डॉ. पद्मराज पाटील हे आमचे सल्लागार असून ते आमच्या लाभार्थ्यांना मोफत मार्गदर्शन व उपचार करतात. डॉ. पद्मराज पाटील यांचे आम्ही खूप आभारी आहोत.

● मुंबईचे डॉ. ध्रुव मेहता हे एक प्रख्यात पात्र आणि अनुभवी फिजिओथेरपिस्ट आहेत. त्यांना जवळपास ४० वर्षांचा सक्रिय अनुभव आहे. आमच्या विनंतीनुसार ते वेळोवेळी अंकुर ला भेट देतात आणि निवासी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करतात आणि फिजिओथेरपी सत्रे घेतात. ते जवळच्या नांदणी आणि जयसिंगपूर येथील अपंग व्यक्तींच्या घरांनाही भेट देतात आणि अपंगांना आणि त्यांच्या काळजी घेणाऱ्यांना फिजिओथेरपी करण्याबाबत मार्गदर्शन करतात. डॉ. ध्रुव मेहता यांचे आम्ही खूप आभारी आहोत.

● साताऱ्याचे श्री. सागर रमेश भोकरे हे स्वतः कर्णबधीर आहेत. तरी गरजू अपंग व्यक्तींची नोंदणी करण्यात आम्हाला मदत करतात. साताऱ्यातील दिव्यांगांना मदत आणि उपकरणे खरेदी आणि वाटप करण्यातही ते आम्हाला मदत करतात. अपंगांना सरकारी पेन्शन मिळवून देण्यासाठीही ते मदत करतात.

● रत्नागिरीच्या डॉ. सौ. मुस्कान सादिक नाकाडे यांचेही आम्ही आभारी आहोत. त्या लाभार्थ्यांना वैद्यकीय सल्ला आणि मार्गदर्शन करतात.

● ''आमचा वैद्यकीय पाठींबा'' अंतर्गत नमूद केलेल्या सर्व डॉक्टर आणि दवाखाने यांचे आम्ही कृतज्ञ आहोत. या सर्व डॉक्टरांनी आमच्या लाभार्थ्यांवर मोफत किंवा अत्यल्प दरात उपचार करून खूप मोलाची मदत केली आहे. तुम्हा सर्वांचे शतशः आभार.

---

**साहस डिसएबिलिटी रिसर्च अँड केअर फाऊंडेशन, कोल्हापूर**

अंकूर अपंग निवासी व्यावसाईक प्रशिक्षण केंद्र, सावकार गणपती मंदिर रोड,

माणगांवे कोडी, नांदणी, जयसिंगपूर-५१६ १०२.

मोबा: श्री साताराम पाटील - ९२८४८९३५४३, मधुताई पाटील - ९४०५५४९८७१,

सचिन पिंपरे - ९७६७९७४४०१.

## कृपया आमच्या लाभार्थ्यांचे हे अभिप्राय आवर्जून वाचा :

आम्ही आमच्या काही लाभार्थ्यांचे अभिप्राय खाली देत आहोत. साहसच्या मदतीमुळे त्यांचे जीवनमान कसे सुधारले ते त्यांनी व्यक्त केले आहे.

---

नांव : राजेश पंढरीनाथ बारपाटे, वय २९ वर्षे

पत्ता : मु. विठ्ठलवाडी, पो. कामारी, ता. वाळवा, जि. सांगली.

साहस नोंदणी क्र. २३०



मला साहसच्या अंकुर वस्तीगृहात प्रवेश देण्यात आला. अंकुर येथे प्रशिक्षण घेत असताना केवळ एका महिन्यात माझ्यात खालील बदल घडले.

आता मी व्हीलचेअरवर बसतो आणि स्वतःहून व्हील चेअर चालवतो. मला खायला घालण्यासाठी मला माझ्या आईवर अवलंबून राहण्याची गरज नाही. मी स्वतः खाऊ शकतो. मी अंथरूणावरून व्हील चेअरवर आणि व्हीलचेअर वरून अंथरूणावर स्वतःहून जाऊ शकतो. मी घराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाऊ शकतो. आता मला पोट साफ करण्यासाठी जुलाब घेण्याची गरज नाही. मी वॉशरूममध्ये जातो आणि कमोड वापरतो. आता मी आधी सारखा बेड पॅन वापरत नाही. मी स्वतः आंघोळ, करू शकतो. कोणाच्याही मदतीशिवाय मी माझे कपडे घालू शकतो. आता मला लघवी आलेली कळते, वाढलेल्या हालचालीमुळे माझे वजन थोडे फार कमी झाले आहे आणि मला भूक लागत आहे आणि मी चांगले जेवत आहे.

कोणतीही हालचाल न झाल्यामुळे माझे शरीर सुस्त झाले होते. अंकुरमध्ये आल्यापासून फिजिओथेरपी उपचारामुळे माझ्या कंबरेत, खांद्यात, गुडघ्यात आणि पाठीच्या कण्यात संवेदना वाढत आहेत.

---

नांव : रामचंद्र बालाजी वाघमोडे, वय : २५ वर्षे

पत्ता : मु. पोस्ट बंडगर गल्ली, देवणी, ता. देवणी, जि. लातूर.

साहस नोंदणी क्र. १६४



२०१९ मध्ये मी मोटर सायकलवरून पडलो आणि पॅराप्लेजिक होऊन पलंगावरच बंदिस्त झालो. नोव्हेंबर २०२२ मध्ये मला शारिरीक पुनर्वसनासाठी साहस डिसॅबिलिटी रिसर्च अँड केअर फौंडेशनच्या अंकुर वसतिगृहात दाखल करण्यात आले. मला एक नवीन व्हील चेअर देण्यात आली. मी कधीच व्हील चेअर वापरली नव्हती. दोन महिन्यांच्या शारिरीक पुनर्वसन प्रशिक्षणानंतर, मी स्वावलंबी झालो आणि जानेवारी २०२२ मध्ये मी स्वतः गाडी चालवत घरी गेलो. आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्यासाठी मी माझा स्वतःचा व्यवसाय चालवणार आहे.



नांव : सूर्यकांत मल्लिनाथ जमादार, वय : ४० वर्षे

पत्ता : मु. पो. मटकी, ता. आळंदी, जि. कलबुर्गी, कर्नाटक.

साहस नोंदणी क्र. ११४

मी गेल्या १५ वर्षांपासून पॅराप्लेजियाने त्रस्त आहे. मला साहस डिसॅबिलिटी रिसर्च अँड केअर फौंडेशन, कोल्हापूर आणि त्यांनी अपंगांच्या पुनर्वसनासाठी केलेल्या कार्याची माहिती मिळत होती. तथापि मी त्यांच्या सुविधांना भेट देऊ शकलो नाही किंवा संस्थेतील कोणालाही भेटू शकलो नाही.

मी मुंबईतील शरण संस्थेत १२ वर्षे काम केले. डिस्चार्ज झाल्यानंतर मी मुंबईत अनुपम डायपरमध्ये काम केले. मला बेड सोअर होते. बेड सोअर बरे झाले पण मला कुठेही जाणे शक्य नव्हते. माझे घर व्हीलचेअर वापरण्यास अनुकूल नव्हते.

नंतर अंकुरमध्ये दाखल होण्यासाठी आणि माझ्या जखमांवर उपचार करण्यासाठी साहसशी संपर्क साधला. मला कळले होते की महाराष्ट्रातील अनेक लोक साहसच्या मार्गदर्शनाखाली बेड सोअर मुक्त झाले आहेत. अपंग लोक नेहमी या विषयावर चर्चा करत असतात.

मला अंकुरमध्ये दाखल करण्यात आले. अंकुर येथे आल्यानंतर, त्यांनी मला बेडसोअरसाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य दिले आणि बेडसोअरची काळजी कशी घ्यावी हे शिकवले. तसेच तंबाखूचे व्यसन किती वाईट आहे याची विविध उदाहरणे देऊन मला संस्थेने तंबाखूच्या व्यसनापासून मुक्त होणासाठी मार्गदर्शन केले. मा. नसीमा दीदी, मधुताई पाटील, साताराम दादा पाटील, सचिन दादा पिंपरे या सर्वांनी माझे मनोबल वाढवले. हे व्यसन सोडण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. गेल्या एक आठवड्यापासून मला खूप बरे वाटत आहे. यापुढे संस्थेसाठी माझ्याकडून शक्य तितके प्रामाणिकपणे काम करून मी तुम्हा सर्वांचा विश्वास संपादन करेन. मला साहसचा एक भाग बनवल्याबद्दल मी तुम्हा सर्वांचा खूप आभारी आहे.

---



नांव : समीउल्ला खान करामातुल्ला खान पठाण, वय : ३४ वर्षे

पत्ता : पोस्ट : लखड, तालुका अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती.

साहस नोंदणी क्र. २४४

२१ फेब्रुवारी २०२२ रोजी मला साहस डिसॅबिलिटी रिसर्च अँड केअर फौंडेशन, कोल्हापूरकडून मोफत व्हीलचेअर मिळाली. तुम्ही माझ्यासाठी जे काही केले त्याबद्दल मी तुम्हा सर्व कार्यकर्त्यांचा आणि साहस संस्थेचा आभारी आहे. मला माझ्या आयुष्यात खूप आनंद वाटत आहे. आता मला जमिनीवर रेंगाळण्याची गरज नाही. तुमच्या सर्व कार्यकर्त्यांनी मला नवीन आयुष्य सुरू करण्यासाठी खूप पाठिंबा दिला आहे. मी नुकतीच सर्व कामे व्हीलचेअरवर बसून करायला सुरूवात केली आहे आणि मला आता घराबाहेर पडायला काहीच भीती वाटत नाही. आता मला अपंग झाल्याची किंचितही वेदना होत नाही. आता माझ्या घरातील सर्व सदस्य खूप आनंदी आहेत, कारण माझ्या घरातील सर्व कामे मी स्वतः करतो.



नांव : महेंद्र मोतीराम पाटील, वय : ४८ वर्षे

पत्ता : मु. कंदाळे, पोस्ट खोंडामाळी, तालुका/जिल्हा : नंदुरबार

साहस नोंदणी क्र. १८९

२००८ मध्ये माझा अपघात झाला. ज्यात मला पाठीच्या कण्याला दुखापत झाली. त्यावेळी मला पॅराप्लेजियाबद्दल काहीही माहिती नव्हती. दरम्यान, माझ्यावर रूग्णालयात उपचार करण्यात आले. पण काही उपयोग झाला नाही. रूग्णालयातील उपचारांसाठी आम्हाला खूप पैसे द्यावे लागले. माझे कुटुंब प्रचंड कर्जबाजारी झाले होते. आमचे कुटुंबीय मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या खचले होते. डॉक्टरांनी मला सांगितले की मला आयुष्यभर व्हीलचेअर वापरावी लागेल. त्यावेळी आर्थिक परिसिथिती इतकी बिकट होती की आम्हाला साधी व्हीलचेअर मिळवणेही कठीण झाले होते. तथापि ते अत्यावश्यक असल्याने, मला २००८ मध्ये एक वापरलेली व्हीलचेअर विकत घ्यावी लागली जी मी पुढील १३ वर्षे वापरली. २020 पर्यंत ही व्हीलचेअर वापरण्यायोग्य राहिली नाही.

एका मित्राच्या माध्यमातून माझा साहस फाऊंडेशनमधील श्री. सचिन पिंपरे यांच्याशी संपर्क झाला. मला साहस फाऊंडेशनकडून एक अतिशय चांगली आधुनिक व्हीलचेअर मिळाली. त्यामुळे आता मी आरामात घराभोवती फिरू शकतो आणि कोणाच्याही मदतीशिवाय बाथरूममध्ये जाऊ शकतो. नवीन व्हीलचेअरच्या मदतीने मी माझे वैयक्तीक काम अधिक चांगल्या प्रकारे करू शकतो. काही दिवसात मी साहसच्या मार्गदर्शनाखाली रॅम्प बांधणार आहे आणि माझ्या व्हील चेअरवर बसून घराबाहेर पडणार आहे.

माझ्या आयुष्यात घडलेल्या सकारात्मक बदलांसाठी साहस डिसॅबिलिटी रिसर्च अँड केअर फाऊंडेशनच्या मदतीबद्दल आणि पाठिंब्याबद्दल मी तुम्हा सर्वांचा खूप आभारी आहे.

---



नांव : स्वप्नील ज्ञानेश्वर धनवटे, वय : ३६ वर्षे

पत्ता : पोस्ट : पुणतांबा, तालुका : राहाता, जिल्हा : अहमदनगर

साहस नोंदणी क्र. १९४

सर्वप्रथम, मी नसीमा दीदी आणि संपूर्ण साहस टीमचे आभार मानू इच्छितो की, त्यांनी साहस डिसॅबिलिटी रिसर्च अँड केअर फाऊंडेशन सुरू केले. अपंगांच्या सर्वांगीण पुनर्वसनासाठी काम करणारी ही संस्था आमच्यासारख्या दिव्यांगांना नवसंजीवनी देते. त्यातून समाजात सन्मानाने जगण्याची नवी उमेद मिळते. त्यामुळे दिव्यांगांना इतरांप्रमाणे जगण्याचा अधिकार असल्याची जाणीव होते. तसेच, साहस ने घराच्या चार भिंतीत बंदिस्त असलेल्या अपंगांसाठी आपली दैनंदिन कामे कशी करावी. बेडपासून व्हीलचेअर पर्यंत सुरक्षितपणे कसे जायचे, व्हीलचेअरवरून कमोडपर्यंत कसे जायचे याविषयी अनेक माहितीपूर्ण व्हिडिओ बनवले आहेत. घरासमोर व्हीलचेअर कशी ठेवायची, रॅम्प कसा बांधायचा, कमोड टॉयलेट इ. अशा व्हिडिआजच्या माध्यमातून प्रेरक भाषणे अनेकांचे उत्साह वाढवत आहेत. त्यासाठी मी साहसच्या सर्वांनी केलेल्या सर्वतोपरी प्रयत्नाबद्दल त्यांचे आभार मानू

इच्छितो.

साहसमधून मला मिळालेल्या मोफत व्हीलचेअरने माझ्या आयुष्यात खूप मोठा बदल केला आहे. दोन ते अडीच वर्षे मी पूर्णपणे अंथरूणावर बंदिस्त होतो. मला साहस फाऊंडेशनकडून चांगल्या दर्जाची व्हीलचेअर मिळाली त्यामुळे माझ्या घरातील सर्वांना खूप आनंद झाला आहे. अशा संस्था अनेक ठिकाणी स्थापन कराव्यात जेणेकरून सर्व दिव्यांगांना त्याचा लाभ घेता येईल. असे माझे कुटुंबीय सतत सांगत असतात. असाच पाठिंबा मिळाल्यास मी लवकरच स्वावलंबी होईन. मी लवकरच माझ्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करेन. साहस आणि संपूर्ण साहस टीमचे पुन्हा एकदा खूप खूप आभार.

---



नांव : स्वाती सदाशिव काटे वय : ३० वर्षे

पत्ता : मु. पोस्ट/ता/जिल्हा : लातूर-४१३ ५१२.

साहस नोंदणी क्र. २५८

मी एक सामान्य निरोगी मुलगी जन्माला आले. मी इयत्ता सहावीपर्यंत नियमित शाळेत शिकले. एके दिवशी खेळता खेळता मी खुर्चीवरून पडले. त्यावेळी मला फारसे दुखले नाही. काही दिवसांनी मला मानेत आणि पाठीत दूखु लागले. मला खूप ताप ही आला. डॉक्टरांनी मला काही इंजेक्शन दिले, त्यानंतर मला लघवीची संवेदना कमी झाली आणि नंतर माझ्या कंबरेच्या खाली सर्व संवेदना बंद झाल्या. त्यावेळी मी ११ वर्षांची होते. माझ्या पाठीचे ऑपरेशन आणि इतर अनेक उपचार केले. पण काही उपयोग झाला नाही. प्रत्येक गोष्टींसाठी मी माझ्या आईवर पूर्णपणे अवलंबून होते.

मी दिवसभर काळजी करत बसायचे. जोपर्यंत माझी आई ह्यात आहे. तोपर्यंत ती माझी काळजी घेत आहे ती गेल्यावर माझे काय होईल ? या विचाराने मी सतत उदासीन असायचे.

एका मित्राकडून साहस आणि अंकुर हॉस्टेलबद्दल ऐकले. मी तिथे जाऊन पहायचे ठरवले. मी श्री. सचिन पिंपरे यांच्याशी बोलले. त्यांनी मला सर्व माहिती दिली आणि मला अंकुरला येण्यासाठी प्रोत्साहन दिले. अंकुर मध्ये आल्यावर रॅम्प, वॉशरूम इतर सर्व सुविधा पाहून मला खूप आनंद झाला. मी एका आठवड्यात सर्व काही शिकले. माझ्यात खूप चांगला बदल झाला आहे. साहसने मला नवीन चांगल्या दर्जाची व्हीलचेअर दिली. मला पंख मिळाल्यासारखे वाटले. मी आता कोणाच्याही मदतीशिवाय संपूर्ण इमारतीत फिरू शकत होते. २० वर्षे अंथरूणाला खिळलेल्या, प्रत्येक गोष्टीसाठी आईवर पूर्णपणे अवलंबून असलेल्या आणि आता स्वतःहून फिरणाऱ्या मुलीच्या आनंदाची तुम्ही कल्पना करू शकता.

मी मेणबत्ती बनवणे आणि शॉपिंग बँग शिवणे शिकले आहे. मी पहिल्यांदाच स्वयंपाकघरात प्रवेश केला आणि हळूहळू स्वतंत्रपणे स्वयंपाक कसा करायचा हे शिकत आहे.

साहसने माझे आयुष्य अपेक्षेपलीकडे बदलले आहे. नसीमा दीदी आणि साहसमधील सर्वांचे मी खूप आभारी आहे.

**आमचे प्रमुख कर्मचारी :**



**श्रीमती मधु महादेव पाटील :** मधाताईंना वसतिगृह व्यवस्थापन आणि काजू प्रक्रियेचा २३ वर्षांचा अनुभव आहे. मधुताई डॉ. नसीमा हुरजूक यांच्यासोबत कोल्हापूराबाहेर निधी संकलन आणि इतर कामासाठी जातात. साहसच्या स्थापनेपूर्वी आणि तेव्हापासूनच्या सर्व उपक्रमांमध्ये मधुताईंनी महत्वाची भूमिका बजावली आहे. सध्या मधुताई अंकुर वसतिगृहाचे व्यवस्थापन पाहतात.



**श्री. सचिन पिंपरे :** व्हील चेअरवर असलेले पॅराप्लेजिक सचिन, डिसेंबर २0२0 मध्ये साहसची अधिकृत नोंदणी होण्यापूर्वीच साहसशी जोडले गेले होते. संपूर्ण महाराष्ट्रातील दिव्यांग व्यक्तींचे व्हॉटस्ॲप ग्रुप बनवण्यात सचिनचा मोठा हात होता. सचिनने साहसकडे नोंदणी केलेल्या सर्व अपंगांचा उपयुक्त डेटा संकलित केला आहे. सचिन हे एक मोठे प्रेरक आहेत. आणि अपंगांना पुनर्वसनासाठी अंकुरमध्ये येण्याच प्रोत्साहन करतात. सचिन अंकुर येथे पाहुण्यांना भेटतात आणि त्यांना साहस व्दारे अंकुर येथे दिल्या जाणाऱ्या पुनर्वसन सेवांबद्दल माहिती देतात. निवासी लाभार्थ्यांच्या बेडसोअर्सवर मलमपट्टी करण्यासही मदत करतात.



**श्री. दीपक कांबळे :** दीपक मार्च २०२२ मध्ये सामाजिक कार्यकर्ता म्हणून साहसमध्ये सामील झाले. दीपकच्या कार्यामध्ये गावांना भेटी देणे, ग्रामपंचायतींना संपर्क करणे आणि कोणत्याही अपंग व्यक्तीला कोणत्याही पुनर्वसन सेवेची आवश्यकता असेल त्याबद्दल माहिती गोळा करणे समाविष्ट आहे. दिव्यांगांच्या गरजा जाणून घेण्यासाठी त्यांच्या घरीही दीपक भेटतात. आधार कार्ड, अपंगत्व प्रमाणपत्र इत्यादी सरकारी कागदपत्रे मिविण्यात दीपक मदत करतात.

### साहसच्या कार्यास आपल्या सहकाराची गरज आहे

'साहस' ही महाराष्ट्रातील दुर्गम खेड्यामध्ये राहणाऱ्या अपंग व्यक्तींना मदत आणि पुनर्वसन देण्याचा प्रयत्न करणारी संस्था आहे. तुमच्या पाठिंब्याने 'साहस' ने डिसेंबर २020 मध्ये सुरुवात केल्यापासून गेल्या १६ महिन्यात चांगले कार्य केले आहे.

'साहस' ला अपंग व्यक्तींना आवश्यक मदत आणि पुनर्वसन सेवा प्रदान करण्यासाठी आणि प्रशासन, कर्मचारी वेतन आणि इतर आवर्ती खर्च भागवण्यासाठी निधीची आवश्यकता आहे.

आपण शक्य त्या मार्गाने खालील प्रमाणे मदत करू शकता.

| | |
|---|---|
| व्हील चेअर प्रायोजित करून | रू. १०,५०० |
| अपंगांच्या वैद्यकीय उपचाराचा एक भाग प्रायोजित करून | रू. २५,००० |
| अंकूर पुनर्वसन केंद्रात एक दिवसाचे जेवण प्रोयोजित करून | रू. ३,००० |
| सामान्य दान करून | कोणतीही योग्य रक्कम |

तुम्ही साहस डिसएबिलिटी रिसर्च अँड केअर फाउंडेशन, कोल्हापूर ला देय असलेला चेक काढू शकता आणि तो आमच्या नोंदणीकृत कार्यालयात पाठवू शकता.
रजि. कार्यालय : द्वारा श्री अजीज हुरजुक, 'नशेमन', २३५/११ इ, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.

अन्यथा तुमची देणगी थेट आमच्या बँक खात्यात जमा करू शकता.

**आमच्या बँक खात्याचे तपशील :**

| | |
|---|---|
| खात्याचे नाव | साहस डिसएबिलिटी रिसर्च अँड केअर फाऊंडेशन, कोल्हापूर |
| बँकेचे नाव | एक्सिस बँक (Axis Bank) |
| शाखा | उंचगांव शाखा, कोल्हापूर-४१६ ११९. |
| खाते क्रमांक | SB A/C 9220 1003 7384 720 |
| IFSC Code | UTIB0003752 |

तुम्ही तुमची देणगी आमच्या खात्यात जमा केल्यानंतर कृपया आम्हाला ई-मेल (patilsataram@gmail.com/ किंवा Whatsapp (9423044498) व्दारे कळवा.

चालू आर्थिक वर्षापासून आम्हाला प्राप्तिकर विभागाच्या पोर्टलवर आर्थिक वर्षात मिळालेल्या देणगीचे सर्व तपशील अपलोड करावे लागतील. धनादेशाव्दारे किंवा ऑनलाईन निधी हस्तांतरणाव्दारे देणगी देताना, कृपया तुमचे पूर्ण नांव, निवासी पत्ता, पॅन क्रमांक (शक्यतो पॅन कार्डचा फोटो) आणि मोबाईल क्रमांक 9423044498 वर पाठवा धन्यवाद. कृपया या बाबतीत सहकार्य करा.

**Thank You.**

साहसला दिलेल्या देणग्या आयकर कायदा १९६१ च्या कलम ८०-G अंतर्गत आयकर सवलतीस पात्र आहेत.

**चांगल्या कार्यासाठी आपण जे देऊ करतो ते अनेक पटीनी वाढून आपल्याकडे परत येते.**

Society registered under The Society Registration Act. 1860 (xxi of 1860)
**Reg. No. Kolhapur / 0000463 / 2020**

## Balance Sheet

For the year ending 31st March, 2022

| FUNDS & LIABILITIES | AMOUNT (Rs.) | AMOUNT (Rs.) |
|---|---|---|
| **I) Trust Funds or Corpus Funds :** | | **1,75,000** |
| a) Balance as per last Balance sheet | 1,55,000 | |
| b) Addition during the year | 20,000 | |
| c) Adjustment during the year | -- | |
| **ii) Other Earmarked Funds :** | | |
| **a) Created under the provisions of the trust deed or scheme or out of the income :** | | |
| a) Balance as per last Balance sheet | 4,00,000 | **14,00,000** |
| b) Addition during the year | 10,00,000 | |
| c) Adjustment during the year | -- | |
| **b) Other Funds :** | | **–** |
| a) Balance as per last Balance sheet | | |
| b) Addition during the year | – | |
| c) Adjustment during the year | -- | |
| **c) Income & Expenditure Accounts :** | | **5,31,206** |
| a) Balance as per last Balance sheet | 1,12,765 | |
| b) Less-Appropriation, if any | -10,00,000 | |
| c) Add-Surplus as per income & expenditure account | 14,18,440 | |
| **iii) Loans :** | | |
| **a) Secured :** | | **–** |
| a) From Bank | – | |
| b) From Trustees | – | |
| c) From Others | -- | |
| **b) Unsecured :** | | **–** |
| a) From Bank | – | |
| b) From Trustees | – | |
| c) From Others | -- | |
| **iv) Current Liabilities :** | | |
| **a) Sundry creditions :** | | **14,121** |
| a) Trade Creditions | – | |
| b) Expense Creditors | 14,121 | |
| **b) Other current liabilities :** | | |
| **Total Rs.** | | **21,20,327** |

As per our report of event date
For Saahas Disability Reseach and Care Foundation, Kolhapur
Add : Nasheman, 235/11, 'E' Ward, Tarabai Park, Kolhapur-416 003.

**For M/s. K. D. Patil & Company**
Chartered Accounts
Firm Regd. No. 155012W

**Dr. Naseema Hurzuk**
President

**Mr. Tej Ghatge**
Secretary

**Mr. Aziz Hurzuk**
Treasurer

**CA Krushnat D. Patil**
Proprietor
Membership No. 603088
UDIN-22603088AMZZPA4604
Place : Kolhapur
Date 01 st July, 2022

Society registered under The Society Registration Act. 1860 (xxi of 1860)
**Reg. No. Kolhapur / 0000463 / 2020**

## Balance Sheet

For the year ending 31st March, 2022

| ASSETS | AMOUNT (Rs.) | AMOUNT (Rs.) |
|---|---|---|
| **I) Fixed Assets :** | | |
| **a) Immovable Property :** | | – |
| a) Balance as per last Balance sheet | | |
| b) Add-Addition during the year | | |
| c) Less-Adjustment during the year | | |
| d) Less-Accumulated depreciation | | |
| **b) Other Fixed Assets :** | | **3,27,626** |
| a) Balance as per last Balance sheet | 39,917 | |
| b) Add-Addition during the year | 3,45,220 | |
| c) Less-Adjustment during the year | – | |
| d) Less-Accumulated depreciation | 57,511 | |
| **ii) Investments :** | | |
| **a) FD with Bank :** | | **16,00,000** |
| a) Balance as per last Balance sheet | 1,50,990 | |
| b) Addition during the year | 17,00,000 | |
| c) Adjustment during the year | 2,50,990 | |
| **b) Other Investments :** | | |
| a) Balance as per last Balance sheet | – | |
| b) Addition during the year | – | |
| c) Adjustment during the year | -- | |
| **iii) Current Assets :** | | **1,92,701** |
| a) Advances | 5,947 | |
| b) Accrued interest on Bank Deposits | 48,908 | |
| c) Deposits | – | |
| - With Bank | – | |
| - With Others | – | |
| d) Sundry Debtors | – | |
| e) Inventory | 25,491 | |
| f) Balance with Bank | 1,05,839 | |
| g) Cash in Hand | 6,516 | |
| **Total Rs.** | | **21,20,327** |

As per our report of even date
For Saahas Disability Research and Care Foundation, Kolhapur
Add : Nasheman, 235/11, 'E' Ward, Tarabai Park, Kolhapur-416 003.

**For M/s. K. D. Patil & Company**
Chartered Accounts
Firm Regd. No. 155012W

**Dr. Naseema Hurzuk**
President

**Mr. Tej Ghatge**
Secretary

**Mr. Aziz Hurzuk**
Treasurer

**CA Krushnat D. Patil**
Proprietor
Membership No. 603088
UDIN-22603088AMZZPA4604
Place : Kolhapur
Date 01 st July, 2022

Society registered under The Society Registration Act. 1860 (xxi of 1860)
**Reg. No. Kolhapur / 0000463 / 2020**

## Income & Expenditure Account

For the year ending 31st March, 2022

| INCOME | AMOUNT (Rs.) | AMOUNT (Rs.) |
|---|---|---|
| **By Interest** | | 54,869 |
| **Accrued :** | | |
| On Bank SB Account | – | |
| On Bank FD Account | 54,869 | |
| **Realised :** | | 14,964 |
| On Bank SB Account | 7,164 | |
| On Bank FD Account | 7,800 | |
| **By Dividend** | | – |
| **By Govermnent Grant** | | – |
| **By Donation in Cash or Kind** | | 40,51,701 |
| **By Any Other Income** | | 834 |
| a) Income from Sale of Candles, Books etc. | 834 | |
| b) Income from Vocational Traning | – | |
| c) Interest on IT Refund | – | |
| d) Miscellaneous Income | – | |
| **By Deficit carried over to Balance Sheet** | | – |
| **Total Rs.** | | **41,22,368** |

As per our report of even date

For Saahas Disability Research and Care Foundation, Kolhapur

Add : Nasheman, 235/11, 'E' Ward, Tarabai Park, Kolhapur-416 003.

**For M/s. K. D. Patil & Company**
Chartered Accounts
Firm Regd. No. 155012W

**Dr. Naseema Hurzuk**
President

**Mr. Tej Ghatge**
Secretary

**Mr. Aziz Hurzuk**
Treasurer

**CA Krushnat D. Patil**
Proprietor
Membership No. 603088
UDIN-22603088AMZZPA4604
Place : Kolhapur
Date 01 st July, 2022

Society registered under The Society Registration Act. 1860 (xxi of 1860)
**Reg. No. Kolhapur / 0000463 / 2020**

## Income & Expenditure Account

For the year ending 31st March, 2022

| EXPENDITURES | AMOUNT (Rs.) | AMOUNT (Rs.) |
|---|---|---|
| **To Expenditures in Respect of Properties :** | | – |
| a) Rates, Taxes, Cesses | – | |
| b) Repairs and Maintainance | – | |
| c) Salaries | – | |
| d) Insurance | – | |
| e) Depreciation (By way of provision of adjustments) | – | |
| f) Other expenses | – | |
| **To Administrative Expenses / Establishment Expenses** | | **4,53,390** |
| **To Remuneration to Trustees** | | **2,40,000** |
| **To Legal Expenses** | | – |
| **To Audit Fees** | | **15,000** |
| **To Contribution and Fees** | | – |
| **To Amount written off :** | | -- |
| a) Bad Debt | – | |
| b) Loan Scholarship | – | |
| c) Irrecoverable Rents | – | |
| d) Other Items | – | |
| **To Miscellaneous Expenses** | | |
| **To Depreciation** | | – |
| **To Amount Transferred to Reserve or Specific Funds** | | – |
| **To Expenditure on Object of the Trust** | | **19,95,538** |
| a) Religious | – | |
| b) Relief of Poverty | – | |
| c) Educational | 43,122 | |
| d) Medical relief | 12,99,848 | |
| e) Other Charitable Objects. | 6,52,568 | |
| **To Surplus carried over to Balance Sheet** | | **14,18,440** |
| **Total Rs.** | | **41,22,368** |

**Notes : -**

1) The trust has met establishment expenses out of grant / donation received for general charitable purpose.
2) Contributions / Donations are recognised entirely in the Statement of Income and Expenditure on receipt basis whereas expenditure & Interest income is recognised on accrual basis.

As per our report of even date
For Saahas Disability Research and Care Foundation, Kolhapur
Add : Nasheman, 235/11, 'E' Ward, Tarabai Park, Kolhapur-416 003.

**For M/s. K. D. Patil & Company**
Chartered Accounts
Firm Regd. No. 155012W

**Dr. Naseema Hurzuk**
President

**Mr. Tej Ghatge**
Secretary

**Mr. Aziz Hurzuk**
Treasurer

**CA Krushnat D. Patil**
Proprietor
Membership No. 603088
UDIN-22603088AMZZPA4604
Place : Kolhapur
Date 01 st July, 2022

## आर्थिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये रू. ५,००० आणि वरील प्राप्त देणग्या

| देणगीदाराचे नाव | रक्कम (रू.) |
|---|---|
| सौ. कल्याणी आनंद भागवत | १०,००,००० |
| सौ. अलमित्रा होशांग पटेल | ३,००,००० |
| श्री. रमेश कचोलिया | १,२५,००० |
| मे. जानीव ट्रस्ट, मुंबई | १,०१,००० |
| सौ. सपना विवेक काळे | १,००,५०० |
| सौ. बिनीता फोरिया | १,०१,००० |
| हसन मुश्रीफ फाऊंडेशन | १,००,००० |
| कै. श्री. महादेव विठ्ठल सामंत चॅरिटेबल ट्रस्ट | १,००,००० |
| श्री. अशोक अण्णासाहेब पवार | १,००,००० |
| डॉ. मोहनराव एस. गुणे | १,००,००० |
| श्री. चंद्रकांतदादा पाटील, (सार्वजनिक योगदानाद्वारे) | १,००,००० |
| श्री मोईनुद्दीन मोखाशी | ५०,००० |
| सौ. मीता रितेन प्रधान | ५०,००० |
| कॅप्टन नौशादअली पाटणकर | ५०,००० |
| श्री. वसीम अजीज हुरजुक | ५०,००० |
| श्रीमती रेहाना एतीबर शाह खान | ४०,००० |
| सौ. भारती मुकेश दलाल | ३०,००० |
| डॉ. अनघा संजय किनारे | २५,००० |
| सौ. नीला प्रदिप पंडित | २५,००० |
| श्री. श्रीप्रकाश श्रीपाद जोशी | २५,००० |
| सौ. श्रीप्रिया श्रीप्रकाश जोशी | २५,००० |
| सौ. नंदिता राव | २५,००० |
| श्री. विक्रमसिंह एच. भोसले | २५,००० |
| सौ. नीता सुधीर अणावकर | २५,००० |
| कॅप्टन नौशादअली पाटणकर | २५,००० |
| डॉ. वासंती विनायक मसुरेकर | २५,००० |
| डॉ. सुभाष मधुकर आठले | २२,००० |
| सौ. नीला चांदोरकर | २१,००० |
| मे. विझन प्रकाशन | २१,००० |
| श्री. शकील अहमद जहिरूद्दीन मोहम्मद | २०,००० |
| सौ. शायमा आफताब देसाई | २०,००० |
| श्री. एम. ए. शेख (नजीरभाई) | २०,००० |
| सौ. नीला प्रमोद सोहोनी | २०,००० |
| श्री. प्रभाकर पुणतांबेकर | २०,००० |
| श्री. मशूद शकूर | २०,००० |
| मे. इ. एस. वेंकटरामन ट्रस्ट | १५,००० |
| मे. स्वेच्छा सेवा | १५,००० |
| श्री. राजाराम आभा कुंभार | १३,६०० |
| श्रीमती जेनोबिया ए. गीयादा | १३,५०० |
| सुश्री शाहजीन जाहिद अत्तारी | १३,५०० |
| श्री. शकील अब्दुल रझाक हेटावकर | ११,८०० |
| सौ. शहनाज आसिफ सय्यद | १०,५०० |
| श्री. हमीद इसाक मोडक आणि कुटूंब | १०,५०० |
| श्री. रिझवान फैज देसाई | १०,००० |
| श्री. मुबीन परकार | १०,००० |
| श्री. दिनेश पाटील | १०,००० |

| देणगीदाराचे नाव | रक्कम (रू.) |
|---|---|
| श्री. नवाज जमालुद्दीन शेख | १०,००० |
| श्री. सैफ रफिक मुल्ला | १०,००० |
| श्री ऋषी रमेश | १०,००० |
| मिस मोहसिन | १०,००० |
| श्री जुबेर गडवाले | १०,००० |
| डॉ. नसीमा मोहम्मद अमीन हुरजुक | १०,००० |
| श्रीमती इंदिरा मॅन्युएल आल्मेडा | १०,००० |
| मे. श्री. कुलस्वामीनी माता चॅरिटेबल ट्रष्ट | १०,००० |
| श्री. सागर आर. निकम | १०,००० |
| श्री. राजेंद्र नामदेवराव धमाल | १०,००० |
| सौ. माधवी राजेंद्र धमाल | १०,००० |
| डॉ.बी.सी. खानोलकर चॅरिटाबल ट्रस्ट | १०,००० |
| श्री. सुलतान कमर काजी | १०,००० |
| श्री. अशोक अण्णासाहेब पवार | १०,००० |
| श्री. विजयकुमार कात्रे | १०,००० |
| श्री. कृष्णात डी. पाटील | ७,५०० |
| श्री. वसीम अजीज हुरजूक | ७,५०० |
| श्रीमती रेहाना एतीबर शाह खान व कुटुंब | ७,००० |
| श्री मनीष पाल | ७,००० |
| सुदर्शन सुब्बाराव सत्संग ग्रुप, चैन्नई | ६,६०० |
| कु. तन्वी आर. शाह | ६,५४० |
| श्री. भरत उनाडकर | ६,५३९ |
| श्री. मुझफ्फर एम. शेख आणि कुटूंब | ५,५०० |
| श्री. अलिंद भटनागर | ५,१०० |
| श्री. दानिश अजीज हुरजूक | ५,००० |
| श्री. सय्यद जिहान अहमद | ५,००० |
| श्री. के. ए. रहमान | ५,००० |
| श्री. अजीम मोहिदिन | ५,००० |
| श्री. विश्वेश शेखर भेंडे | ५,००० |
| सौ. रश्मी प्रकाश उराडे | ५,००० |
| सौ. मंजुळा रतीलाल मेहता | ५,००० |
| श्री. नितेश रविंद्र दळवी | ५,००० |
| श्री. फारूक काजी आणि कुटूंब | ५,००० |
| सौ. शहनाज मोहम्मद युसूफ हुरजूक | ५,००० |
| सौ. नाहिद एम. मोखाशी | ५,००० |
| सौ. नीता सुधीर अनावकर | ५,००० |
| श्री. मिहीर राजेंद्र धमाल | ५,००० |
| सौ. गौरी सुभाष भोसले | ५,००० |
| डॉ. सुरेश पाटील | ५,००० |
| श्री. चंद्रकांत दत्तात्रय | ५,००० |
| सौ. कुलसुम लुकमानजी | ५,००० |

आम्ही आमच्या प्रत्येक देणगीदारांचे आभारी आहोत. मात्र जागेच्या मर्यादेमुळे आम्हाला काही देणगीदारांची नावे सोडावी लागली ज्यांनी रू. ५,००० पेक्षा कमी योगदान दिले आहे.

**THANK YOU ALL**

SaahaS

## साहस डिसएबिलिटी रिसर्च अँड केअर फाऊंडेशन, कोल्हापूर

रजि. कार्यालय : द्वारा : श्री. अजीज हुरजुक, ‘नशेमन’, २३५/११ इ, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
प्रशासकीय कार्यालय : द्वारा : श्री. साताराम पाटील, २६७/७७ बी, सुंदरसिंग हौसिंग सोसायटी, शांती नगर (पूर्व),
उंचगाव, तालुका – करवीर, जिल्हा – कोल्हापूर – ४१६ ००५.
मोबा: डॉ. नसीमा हुरजुक – ९८२२०९०८९८, श्री साताराम पाटील – ९४२३०४४४९८




'Ankur' Rehabilitation Center at Nandni, Jaisingpur



Happy trio at 'Ankur' Rehab Center

## • Candle making Vocational Training at 'Ankur' •



Learning is fun



Group activity



Pouring wax in moulds



Instructor at work




Finishing and packing the candles




Marketing the candles

## • Vocational Training in Tailoring, Cooking & Office Management •




Learning stitching at Ankur




Learning cooking for the first time




Learning office work

## Physiotherapy at 'ANKUR'










Dr. Dhruv Mehta taking physiotherapy in 'Ankur' and at the home of a paraplegic



Madhutai Patil receiving 'Mamata Puraskar'on behalf of Naseema Didi




A few inmates of 'Ankur' with Naseema Didi




Visit to Airoli center of Paraplegic Foundation




Meeting disabled beneficiaries at Murbad.



A worn out wheel chair replaced with a new wheel chair




Taking patients with bed sores for admission to a hospital in Mumbai




Giving guidance at a function for the disabled organized by 'Prahar' at Murbad